Research Papers

# विलापिका आणि राजहंस माझा निजला

**प्रा. रविकिरण शेटे**
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,
उस्मानाबाद

## प्रस्तावना :–

मराठीमध्ये वैलापिक काव्यात गंगाधर रामचंद्र मोगरे यांना अग्रपुजेचा मान दिला जातो. विलापिकेचं उत्तम उदाहरण म्हणजे गोविंदाग्रजांची राजहंस माझा निजला. एजेलॉस या ग्रीक शब्दापासून एलेजी हा इंग्रजी शब्द उत्पादीत झाला. त्याचा मराठीतील पर्याय विलापिका असा आहे. यालाच विलापगीत किंवा विलापकाव्य असेही म्हणता येते. विलापिका जसा काव्य प्रकार आहे. तसाच वृत्त प्रकारही आहे. पूर्वी यात कोणत्याही विषयावर रचना होत असे पण हळूहळू विलाप ज्याचा मध्यवर्ती गाभा आहे. अशाच विषयावर या वृत्तात रचना होऊ लागली आणि विलापिका या काव्य प्रकाराला आकार येवू लागला.

कवितेतील आशय आणि अनुभव हा संवेदनशिल स्वरुपाचा असतो. हे कवितेचे अटळ अंग असते. याचा प्रत्यय विलापिकेते येतो. अत्यंत जीवलग किंवा आदरणीय व्यक्तीच्या मृत्यूने मनाला झालेले विलक्षण दुःख हा विलापिकेचा गाभा आहे. जीवलगाचा मृत्य ही मानवी जीवनातील सर्वात शोककारक घटना आहे. मृत्यूचे गुढ अनाकलनीय असते. ते व्यक्तीला चिंतन प्रवृत्त करते. मृत्यूनंतर प्रचंड शोक भावनेचा सागर उसळला तरी पुढे मृत्यूविशयक चिंतनाने मानवी जीवनाच्या वास्तवाचे खरे दर्शन व्यक्तीला घडते.

जीवनातील क्षणभंगुरता प्रत्ययास येवून जीवनातील सत्य–असत्य, दुःख–आनंद, शाश्वत–अशाश्वत या विषयीची असंख्य विचारांची घुसळणे मनात होते. वस्तू, व्यक्ती, घटना यांचे संबंध गळून त्यांना वेगळा अर्थ प्राप्त होतो. मृत्यूच्या जाणीवेने आलेली निराशा, अगतिकता, विशन्नता असे अनेक भाव मनात जागे होतात. धार्मिक विचारांचा कल्लोळे मनात माजतो. जी व्यक्ती आयुष्यातून निघुन गेलेली असते. तिच्याविशयीच्या आठवणीचे मोहोळ मनात उठते. तिच्याविना आपल्या आयुश्यात निर्माण झालेली पोकळी सतत एका विदारक सत्याला तोंड द्यायला भाग पाडत असते.

या सगळ्यांचे मिश्रीत रसायन म्हणजे विलापिकेच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारी अनुभूती होय. ही अनुभूती प्रगट होताना जेवढी व्यापक, गंभीर आणि भावना परिपोश साधणारी असते. तेवढे विलापिकेचे महत्व वाढते. पत्नीचा, प्रेयसीचा, मित्राचा किंवा अपत्याचा चिरयोग सर्वात अधिक शोककारक असतो. त्यातून निर्माण होणारी विलापिका शोक प्रभावाने अधिक स्पष्ट उत्कट उतरणार हे उघड आहे. विरहातही शोक असतो. परंतु विरहकाव्याला मात्र विलापिका म्हणता येणार नाही. कारण विरहात काव्याचा मुख्य रसे हा करुण नसून विप्रलंभ शृंगार असतो.

विलापिका एककेंद्री अनुभूतीचा काव्य प्रकार आहे. त्यामुळे या एकाच केंद्राच्या अनेक छटा कविला न्याहाळाव्या लागतात व त्यातील खोल आणि उत्कट अनुभूती अभिव्यक्त करावी लागते. एकीकडे खोल चिंतनाच्या डोहात बुडी घ्यावी लागते तसेच दुसरीकडे भावनांचा फुलोरा टिकवून धरावा लागतो. भाव आणि चिंतनाचे एकजिवित्व बिघडले तर निरस तत्त्व चिंतनाचे बळ कमी पडून दुसऱ्या भावाच्या फुलोऱ्यावर तिला जगवण्याचा प्रयत्न केला तर अतिनाट्यात्मक होण्याची शक्यता असते. तत्त्वचिंतन, आत्मनिश्ठा आणि नाट्यकथा यांच्या संयुक्त रसायनाने मृत व्यक्तीच्या वैशिष्ट्यांचे व संबंधीत असणाऱ्या कवीच्या उत्कट मनोभावाचे दर्शन विलापिकेत कलात्मक पातळीवरुन घडावे अशी विलापिकेस अपेक्षा असते.

वैलापिक काव्यात गंगाधर रामचंद्र मोगरे यांना अग्रपुजेचा मान दिला जातो. त्यांच्या आगोदर मराठीमध्ये म.मो.कुंटे यांनी 1870 साली कोल्हापूरच्या राजाराम महाराज यांच्या विसाव्या वर्षी झालेल्या अकाली निधनावर विलापिका लिहिली होती. परंतु ती अतिशय बाळबोध आहे. मोगऱ्यांची समकालीन जवळच्या व्यक्तीच्या निधनानंतर अनेक विलापिका लिहिल्या पण उत्कट भाशाभिक्तीच्या अभावी यात यांत्रिकता आली आहे.

वि. भ. लेभ्यांचे शोकवर्त अधिक सरस आहे. विलापिकेत हमखास जाणवणारी तत्त्वचिंतनाची कमतरता बापाचे अश्रू या विलापिकेद्वारा भरुन काढण्याचे कार्य रेवरंट टिळकांनी केले. अर्वाचीन काळातील परंपरागत दीर्घ वैलापिक काव्य लिहीण्याकडे प्रवृत्ती होती तर आधुनिक कवीची स्फुट वैलापिक कविता

लिहिण्याकडे जास्त कल होतो. चंद्रशेखरांच्या दत्तवियोग, माधवनिधन, युवराज वियोग, अश्रूगर्भ इ. कविता किंवा माधव यांच्या बालकवी आणि रे.वा.ना. टिळकांच्या निधनावरील कविता प्रसिध्द आहेत. तसेच इतिहासपुजन हा त्यांच्या प्रतिभेचा विशय असल्याने सवाई माधवराव, गोखरखा या विलापिका गाजल्या.

आईच्या मृत्यूवर लिहिलेल्या कांही कवितांचा विलापिकेत समावेश करता येणे शक्य आहे. याशिवाय भा. रा. तांब्याची उडाला हंस न येईल, माता ते कोण या ठायी, ही भाव उत्कट विलापगीते किंवा गोविंदाग्रजांचे राजहंस माझा निजला हे विलापगीते चटका लावणारे आहे. वि. दा. सावरकरांची प्रभाकरास किंवा अनिलांनी अंत या पुत्र वियोगावर लिहिलेल्या विलापिका त्यातील खोल उत्कट अनुभूतीमुळे व भावगर्भ चिंतनामुळे अतिशय हृदयद्रावक उतरल्या आहेत.

अलिकडच्या काळात मात्र या काव्य प्रकाराला ओहोटी लागल्याची दिसते. कारण अकाली निधनाचे प्रमाण कमी होणे हे एक व्यवहारिक कारण असले तरी निधनामुळे वाट्याला येणारी शोकानुभूती काव्यात्मक पातळीवर नेण्याची आजच्या कवींची क्षमता कमी होत चालली आहे. यामुळेच अलिकडे विलापिका या काव्य प्रकाराला उतरती कळा लागल्याचे जाणवते.

### *राजहंस माझा निजला*

राम गणेश गडकरी, जन्म 26 मे 1985 गुजरातमध्ये नवसारी तालुक्यात गणदेवी येथे. वास्तव्य व शिक्षणः– दामनगर (सौराश्ट्र), पुणे व कर्जत येथे. मॅट्रिक परीक्षा. व्यवसायः– शिक्षक, पुण्याच्या ज्ञानप्रकाश चे उपसंपादक, 1913 साली तुतारी मंडळाची स्थापना. काव्यलेखनः– वाग्वैजयंती (1921), नाटकेः– वेड्याचा बाजार, गर्वनिर्वाण, प्रेमसंन्यास, तोड ही माळ, पुण्यप्रभाव, राजसंन्यास, एकच प्याला, भावबंधन इ.

गडकऱ्यांच्या अत्यंत लोकप्रिय कविता मध्येक राजहंस ही कविता सर्वश्रेश्ठ मानावी लागेल. मुरली, राजहंस आणि प्रेम आणि मरण या तीन कवितांनी त्यांना मराठी काव्यप्रांतात अमर करुन सोडले आहे. या कवितेची मांडणी चांगली असल्यामुळे काही दोश असूनही कविता अत्यंत परिणामकारक झाली आहे.

पतिनिधनाच्या दारुण प्रसंगाने आधीच जिच्यावर दैवाचा कूर घाला पडला आहे. अशा एका विधवा स्त्रीचा एकुलता एक पुत्र काळाने हिरावून नेल्याने तिच्यावर डोंगर कोसळला आहे. पुत्र निधनाच्या शोकाने भ्रमिश्ठ झालेली ती स्त्री आपला पुत्र झोपी गेलेला आहे अशा समजुतीने बोलत आहे. अशी कवितेची बैठक आहे त्या विधवा स्त्रीच्या कारुण्यमय जीवनाच्या पार्श्वभूमीवर कवीने तिच्या भ्रममूलक मनःस्थितीचे चित्र रंगविले आहे.

त्या स्त्रीचा पती नुकताच निधन पावला आहे आणि आता तिचा एकुलता एक पुत्र मृत्यूने ओढून नेल्यामुळे तिची स्थिती अत्यंत करुणाजनक झाली आहे. पण या स्थितीचे वर्णन करणे ही या कवितेची मध्यवर्ती कल्पना नव्हे ही नुसती पार्श्वभूमी आहे. अति शोकावेगाने भ्रमिष्ठ झालेल्या त्या स्त्रीची, आपला पुत्र जिवंत असल्याबद्दलची दृढ समजूत आणि त्या भ्रमजन्य मनःस्थितीत, तिच्या बालकाच्या मृत्यूची वास्तव कल्पना ज्यांना आहे अशा सभोवतालच्या व्यक्तींची तिने केलेली निर्भत्सना हा काव्याचा मुख्य विशय आहे. भ्रमामुळे उद्भवलेले स्वतःच्या बालकाच्या मृत्यूविषयीचे तिचे अज्ञान आणि वास्तव परिस्थिती यामधील विरोध हे या काव्यातील करुण रसाचे उगमस्थान आहे.

शोकाचा कळस होऊन ती स्त्री भ्रमिष्ट बनली, आणि आपले बालक झोपले आहे, मृत झालेले नाही हे ती सभोवतालच्या लोकांना पटवू लागली. त्यांचाच हा कावा आहे असे तिला वाटते.

***ते हिराच तेंव्हा नेला!***
***हिरकणीस आता टपलां!***
***परि जिवापलिकडे याला!***
***लपवीन! एकची मजला!***
***राजहंस....... ।।***

असे बोलून ती त्या बालकाचे गुणवर्णन करु लागते. जिवंत असताना जे गुणवर्णन आनंददायक ठरले असते तेच गुणवर्णन वाचकांना आता असह्य होते. त्या बालकाचे कुरळे केस, आईच्या मुखावर खिळलेली त्याची दृश्टि, त्याच्या मुखावरचे ते तेज त्याच्या खेळाचा चाळा, यांचे वर्णन करुन ती त्यांना बजावते,

***मी गरिब कितीही असले । जरि कपाळ माझें फुटले ।।***
***बोलणें जतरी हे असले । खपणार नाही हो मजला ।***
***राजहंस माझा निजला......***

आपल्यावर असा प्रसंग परमेश्वर आणणारच नाही तिची खात्री आहे.

***ही कुऱ्हाड आकाशाची,***
***मजवरती पाडायाची***
***नाहींच कल्पना त्याची***
***हा सगळा तुमचा कावा । राजहंस माझा निजला .... ।***

असे म्हणून ती त्या भोवतालच्या माणसांना यमदुतांहून अधिक निष्ठूर ठरविते. प्रत्यक्ष यमदूत जरी आले तरी ते त्या बालकाचे सौंदर्य पाहून भुलतील व त्यांच्याही हृदयाचे पाणी होऊन ते त्याचे चुंबन घेऊ लागतील असे म्हणून ती आपल्या मृत बालकाचे चुंबन घेऊ लागते. साहजिकच भोवताली जमलेल्या मंडळींना (वाचकांनाही) ते दृश्य पाहवेना म्हणून त्यांनी दुसरीकडे माना फिरविल्या. हे पाहताच ती त्यांना म्हणते–

***मी मुका असा घेतांना***
***हा पहा पुन्हा हसलाना***
***का अशा फिरविता माना?***
***सुख खुपे काय डोळ्यांना ?***
***राजहंस माझा निजला.....***

याठिकाणी तिच्या भ्रमाची आणि निर्भत्सनेची परमावधी झाली आहे आणि त्यामुळे कारुण्याचाही परमोत्कर्श झाला आहे. सुख खुपे काय डोळ्यांना?हा प्रश्न त्या माणसांच्या हृदयात सुरीसारखा घुसला असला पाहिजे, अगदी असह्य असा हा प्रसंग आहे. बालकाच्या सौंदर्याचे, त्याच्या मधुरहास्याचे, लीलांचे ती कौतुक करु लागते तसतसे हे कौतुकाचे शब्दच करुण बनतात.

अशाप्रकारे मराठी काव्यप्रांतात गोविंदाग्रजांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. प्रतिभासंपन्न कवी यादृश्टिने त्यांची बरोबरी फारच थोडे कवी करु शकतील. भावनोत्कटता, नेत्रदीपक कल्पकता, भाशेचा झगझगाट, गुढगुजन, मनोहर वर्णनशैली या विविध विशेशांनी त्यांचे काव्य मराठी भाशेत अमर झाले आहे.

### *संदर्भः–*

1.कल्याण काळे, डॉ. अंजली सोमन, (संपादक) भाषांतर मिमांसा.
2.फ. म. शहाजिंदे (संपादक), मराठवाड्यातील कविता, निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती.
3.आकंठ दिवाळी 95, कविता विशेशांक.
4.वसंत बापट शतकाच्या सुवर्णमुद्रा, साधना प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, 2002